आकाशवाणी मुंबई

राष्ट्रीय बातमीपत्र - रात्री ८.०५ वाजता

१२ नोव्हेंबर २०२४ - मंगळवार

**ठळक बातम्या**

- महायुती सत्तेत आल्यावर राज्याच्या विकासाचा वेग दुप्पट होईल, प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांचं प्रतिपादन
- उद्योगपतींच्या माफ झालेल्या कर्जाइतकी रक्कम राज्यातले शेतकरी, कष्टकरी आणि गरिबांना देण्याचं काँग्रेस नेते राहुल गांधी यांचं आश्वासन
- झारखंड विधानसभा निवडणुकीच्या पहिल्या टप्प्यात ४३ मतदारसंघात उद्या मतदान
- CISF मध्ये पूर्णपणे महिलांचा समावेश असलेल्या पहिल्या बटालियनच्या स्थापनेला केंद्रीय गृहमंत्रालयाची मंजुरी

**आणि**

- महिलांच्या आशियाई करंडक हॉकी स्पर्धेत दक्षिण कोरियावर भारताचा विजय

**<><><><><>**

महायुती सत्तेत आल्यावर राज्याच्या विकासाचा वेग दुप्पट होईल, असं आश्वासन प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी दिलं. ते आज चंद्रपूर जिल्ह्यातल्या **चिमुर** मतदारसंघात आयोजित प्रचारसभेला संबोधित करत होते. महायुती सरकारच्या कामगिरीचा आढावा त्यांनी यावेळी घेतला. महायुतीची सत्ता आल्यावर सोयाबीन उत्पादक शेतकऱ्यांना ६ हजार रुपये हमीभाव दिला जाईल, असं आश्वासनही त्यांनी यावेळी दिलं.

महायुतीचं सरकार हवं, असा जनतेचा आवाज राज्याच्या कानाकोपऱ्यातून ऐकू येत असल्याचं प्रधानमंत्री **सोलापूरच्या सभेत म्हणाले.** काँग्रेस आरक्षण संपवण्याचा प्रयत्न करत असून विविध समाजात फूट पाडण्याचा, विविध जातींना आपापसात लढवण्याचा प्रयत्न करत असल्याचा आरोप त्यांनी केला.

**होल्ड बाईट ...सोलापूर मोदी ( २३ सेकंद)**

गेल्या काही वर्षात राज्यात परकीय गुंतवणुकीत मोठ्या प्रमाणात वाढ झाली असून याचा फायदा **पुण्याला** झाल्याचं प्रधानमंत्री पुण्यात झालेल्या प्रचारसभेत म्हणाले. परकीय कंपन्यांची पसंती महाराष्ट्राला सर्वाधिक आहे, आयटी आणि इलेक्ट्रॉनिक्स क्षेत्रात गुंतवणूक वाढल्यावर पुण्यात कंपन्यांची संख्या वाढली. त्यामुळे तरुणांना रोजगाराची संधी निर्माण झाली असं मोदी यांनी सांगितलं.

**<><><><><>**

भाजपाचे ज्येष्ठ नेते केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांनी आज मुंबईत घाटकोपरमधे प्रचारसभा घेतली. अल्पसंख्यकांना आरक्षण मिळू देणार नाही, असं ते यावेळी म्हणाले. मुस्लिम धार्मिक नेत्यांनी १० टक्के आरक्षण मागितलं आहे. मात्र हे आरक्षण देण्यासाठी कुणाचं आरक्षण कमी करणार असा प्रश्न त्यांनी विरोधी पक्षांना केला.

राम मंदिर बांधण्याचं आश्वासन आम्ही दिलं होतं, ते पूर्ण केलं. काशी विश्वनाथ कॉरिडॉरही तयार केला. वक्फमधे सुधारणा करण्याचा प्रयत्न केला आणि याबाबतच्या कायद्यात दुरुस्ती केली जाईल, असं आश्वासन त्यांनी दिलं. कोणतीही जमीन अशीच वक्फची होऊ शकत नाही, असं ते म्हणाले.

**<><><><><>**

महाराष्ट्र आणि झारखंडमधल्या विधानसभा निवडणुकीत काँग्रेस पक्ष मतांसाठी फुटीरवादी शक्तींसोबत कटकारस्थान करत असल्याचा आरोप, भाजपानं केलं आहे. भाजपाचे ज्येष्ठ नेते रविशंकर प्रसाद यांनी आज नवी दिल्लीत बातमीदारांशी बोलताना हा आरोप केला. काँग्रेस आणि इंडिया आघाडीतले पक्ष संकुचित मनोवृत्तीचे असून, अल्पसंख्यकांच्या उन्नतीला देखील त्यांचा विरोध आहे, असं ते म्हणाले.

**<><><><><>**

काँग्रेसशासित कर्नाटक, तेलंगणा, हिमाचल प्रदेश सरकारांनी जनतेची फसवणूक केल्याचा आरोप भाजप नेत्यांनी आज मुंबई इथे केला. तेलंगणातले जी. किशन रेड्डी, कर्नाटकातल्या शोभा करंदलाजे आणि हिमाचल प्रदेशातले खासदार अनुराग ठाकूर यांनी या पत्रकार परिषदेला संबोधित केलं.

**<><><><><>**

उद्योगपतींच्या माफ झालेल्या कर्जांच्या इतका पैसा राज्यातले शेतकरी, कष्टकरी आणि गरिबांना देण्याचं आश्वासन काँग्रेस नेते राहुल गांधी यांनी दिलं आहे. गोंदिया इथल्या प्रचारसभेत ते बोलत होते. आम्हाला अरबपतींचा नाही तर शेतकऱ्यांचा, कष्टकऱ्यांचा, तरुणांचा भारत हवा आहे, असं ते म्हणाले. देशात सर्वाधिक जीएसटी गरीबांच्या खिशातून जातो, असा दावाही त्यांनी केला....

**होल्ड--बाई-- राहुल गांधी.**

विविध समाज घटकांना देशाच्या निर्णयप्रक्रियेत, तसंच विविध क्षेत्रांमध्ये योग्य प्रतिनिधित्व मिळत नाही. हा या समुदायांचा सर्वात मोठा अपमान असल्याची टीका त्यांनी केली. जातनिहाय जनगणना आणि आरक्षणावरची ५० टक्क्यांची

मर्यादा हटवण्याच्या आश्वासनांचा पुनरुच्चार त्यांनी केला. महाविकास आघाडीच्या जाहीरनाम्यातल्या आश्वासनांची पूर्तता करण्याची हमी त्यांनी राज्यातल्या मतदारांना दिली.

ही विचारधारेची, राज्यघटनेची लढाई आहे. संविधान हे द्वेषाला प्रेमाने हरवण्याचा संदेश देणारं पुस्तक असल्याचं ते म्हणाले.

तत्पूर्वी, राहुल गांधींची चिखली इथली सभा विमानातल्या तांत्रिक बिघाडामुळे रद्द करण्यात आली.

<><><><><>

माहीम विधानसभा मतदारसंघात शिवसेनेचे उमेदवार सदा सरवणकर यांनी माघार घेऊन अमित ठाकरे यांना पाठिंबा द्यायला हवा होता, असं मत महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे नेते बाळा नांदगावकर यांनी व्यक्त केलं. ते आज मुंबईत बोलत होते.

<><><><><>

कोणत्याही पक्षाला प्राधान्य न देता निष्पक्षपणे काम करण्याचे निर्देश मुख्य निवडणूक आयुक्त राजीव कुमार यांनी केंद्रीय निरीक्षकांना दिले. राज्यात विधानसभा निवडणुकीसाठी तैनात निरीक्षकांच्या आढावा बैठकीत ते बोलत होते. सर्व उमेदवारांशी संपर्क ठेवा आणि त्यांच्या तक्रारी गांभीर्यानं घेण्याचे आदेश त्यांनी दिले. अवैध वाहतूक होत असलेल्या निर्बंधित वस्तू, पैसे, मद्य वगैरे सामानावर कडक लक्ष ठेवा. कोणत्याही राजकीय पक्षाला किंवा नेत्याला प्राधान्य देऊ नका,

असंही त्यांनी सांगितलं. राज्यातल्या २८८ मतदारसंघात १४२ सामान्य निरीक्षक, ४१ पोलीस निरीक्षक आणि ७२ खर्च निरीक्षक कार्यरत आहेत.

**<><><><><>**

श्रोते हो, विधानसभा निवडणुकीच्या निमित्तानं 'आढावा विधानसभा मतदारसंघांचा' हा कार्यक्रम दररोज संध्याकाळी ७ वाजून १० मिनिटांनी अस्मिता वाहिनीसह प्रादेशिक वृत्त विभागाच्या Youtube वरुन प्रसारित केला जात आहे. या कार्यक्रमात उद्या अहिल्यानगर जिल्ह्यातल्या मतदारसंघांचा आढावा आपल्याला ऐकता येईल.

**<><><><><>**

झारखंड विधानसभा निवडणुकीच्या पहिल्या टप्प्यासाठी उद्या मतदान होत आहे. या टप्प्यात ४३ मतदारसंघात मतदान होणार असून त्यासाठीची तयारी पूर्ण झाली आहे. यासाठी २२५ संवेदनशील मतदान केंद्रांसह एकूण १५ हजार ३४४ मतदान केंद्र उभारली आहेत. सुरक्षा दलाच्या दोनशेहून अधिक तुकड्या तैनात आहेत. सकाळी सात ते संध्याकाळी ५ या कालावधीत मतदान होईल. आसाम विधानसभेच्या पाच, बिहार विधानसभेच्या चार, कर्नाटकातल्या ३ जागांसाठी तर केरळात लोकसभा आणि विधानसभेच्या प्रत्येकी एका जागेसाठी उद्या होणाऱ्या मतदानाची तयारी पूर्ण झाली आहे.

**<><><><><>**

मोबाइल कॉल न लागणं, बोलता बोलता कॉल बंद होणं यासारख्या ग्राहकांना येणाऱ्या समस्यांवर दूरसंचार मंत्रालय लक्ष ठेवून आहे. यासंदर्भातल्या निकषांचं

उल्लंघन करणाऱ्या कंपन्यांना दंड ठोठावण्याचा मंत्रालयाचा विचार आहे. सध्या वर्षातून चार वेळा ऐवजी दर महिन्याला कॉल्सच्या गुणवत्तेवर लक्ष ठेवलं जातं आहे.

**<><><><><>**

CISF अर्थात केंद्रीय औद्योगिक सुरक्षा दलातल्या पूर्णपणे महिलांचा समावेश असलेल्या पहिल्या बटालियनला केंद्रीय गृहमंत्रालयानं आज मंजुरी दिली. CISF च्या ५३ व्या स्थापना दिनानिमित्त केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांनी हे आदेश दिले होते. सध्या यात दलात ७ टक्के महिला आहेत. नव्या बटालियनची भरती, प्रशिक्षण आणि मुख्यालयासाठी CISF नं काम सुरू केलं आहे. अतिमहत्त्वाच्या व्यक्तींच्या सुरक्षेतल्या कमांडोपासून विमानतळ आणि मेट्रोच्या सुरक्षेचं कामही करू शकतील, असं प्रशिक्षण या महिलांना दिलं जाणार आहे.

**<><><><><>**

सगळ्यांच्या हितासाठी झटण्याची प्रेरणा महात्मा गांधी यांच्या विचारातून मिळते, असं प्रसारभारतीचे अध्यक्ष नवनीत कुमार सेहगल म्हणाले. नवी दिल्लीत आकाशवाणी भवन इथं झालेल्या सार्वजनिक सेवा दिनाच्या कार्यक्रमात ते बोलत होते. देशभरात माहिती आणि शिक्षणाचा प्रसार करणं आणि सांस्कृतिक विविधता जपणं यासाठी आकाशवाणीच्या योगदानाची माहितीही त्यांनी दिली. आकाशवाणीच्या महासंचालक डॉ प्रज्ञा पलिवाल गौर,  दूरदर्शनच्या महासंचालक कांचन प्रसाद  यावेळी उपस्थित होत्या.

**<><><><><>**

महिलांच्या आशियाई करंडक हॉकी स्पर्धेत भारतानं तीन वेळच्या विजेत्या दक्षिण कोरियाचा ३-२ असा पराभव केला. बिहारमधे राजगीर इथं हा सामना

झाला. भारतातर्फे संगीता कुमारीनं तिसऱ्याच मिनिटाला पहिला गोल केला. दिपीका सेहरावतनं दोन गोल केले.

भारतानं काल मलेशियावर ४-० नं मात करत विजयी सलामी दिली. सलग दोन विजयांमुळे भारत गुणतालिकेत चीनच्या पाठोपाठ दुसऱ्या स्थानावर आहे. दोन्ही संघांचे प्रत्येकी सहा गुण आहेत. मात्र २० गोल केल्यामुळे चीन अग्रस्थानी आहे.

**<><><><><>**

जागतिक अजिंक्यपद पटकावल्याद्दल बिलियर्ड्सपटू पंकज अडवाणी यांचं प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी अभिनंदन केलं आहे. पंकज अडवाणी याचं खेळाप्रतिचं समर्पण आणि वचनबद्धता यांचं प्रधानमंत्र्यांनी कौतुक केलं.

**<><><><><>**